# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०१ ऑगस्ट, २०१६ / श्रावण १०, १९३८ ( शके )**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण मंत्री**
**(४) पर्यावरण मंत्री**
**(५) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३०**

---

**शासनाकडून साहित्य महामंडळाला मिळणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(१) * ५५४३८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व या महामंडळाच्या ४ घटक संस्था (महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, विदर्भ साहित्य संघ, नागपूर आणि मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद) तसेच

कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी व दक्षिण महाराष्ट्र सभा, कोल्हापूर या ७ साहित्य संस्थांना प्रत्येकी रु.५.०० लक्ष या प्रमाणे एकूण रु.३५.०० लक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून साहित्य महामंडळाला मिळणारे अनुदान अपूरे पडत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामंडळाला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण तसेच मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती क्षेत्रात काम करणाऱ्या या संस्थेला देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांचेकडून उपरोक्त सात साहित्य संस्थांच्या प्रचलित अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या ट्रामा केअर सेंटरमधील नवीन पदांच्या प्रस्तावाबाबत

**(२) * ५७९५७ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या ट्रामा केअर सेंटरमध्ये सन २०१२ मध्ये ६०० नवीन पदांचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने डीएमईआरकडे पाठविला असून उक्त प्रस्तावाला मंत्रिमंडळाकडून मंजूरी मिळाली नसल्याचे सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ट्रामा केअर सेंटरकरिता न्यरोलॉजी, ऑर्थोपेडिक, हदयरोग व उरोशल्यचिकित्सा विभागाचे (सीव्हीटीएस) प्रत्येकी एक प्राध्यापक आणि या विभागाच्या पाच सहयोगी प्राध्यापक, वर्ग दोनचे १८ सहयोगी प्राध्यापक, ११ वरिष्ठ निवासी डॉक्टर, टयुटर, प्रशासकीय अधिकारी व कार्यालय अधिकारीसह असे प्रत्येकी एक पदाची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ट्रामा केअर सेंटरची पाहणी केली असता वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१४ रोजी ३०१ पदांचा प्रस्ताव डीएमईआरकडे पाठविण्याची सूचना केल्यानंतर उक्त प्रस्ताव दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ रोजी मंत्रिमंडळाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आला असून अद्याप प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे,

परंतु सदरची पदे ही भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार व केंद्र शासनाने ट्रामा केअर सेंटरच्या श्रेणीनुसार निश्चित केलेल्या मानकांप्रमाणे आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) पद निर्मितीचे शासन आदेश निर्गमित करण्यात आले असून पद भरतीची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील गावांमध्ये पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण होऊनही पाणी पुरवठा होत नसल्याबाबत

**(३) * ५९४८८ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील नंडोरे-देवखोप, अंबाडी, शेलवाली, वरखुंटी, कमारे, पडघे, नंडोरे, वाकोरे, बिरवाडी या नऊ गावात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सन २००९ मध्ये पाणी पुरवठा योजनांचे काम पूर्ण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजनांच्या कामाचे रुपये ९४ लक्ष १२ हजार २९० इतकी रक्कम ठेकेदाराला अदा करण्यात आली असून ९ पैकी ७ गावात पाण्याच्या टाक्या उभारुन जलवाहिन्यांचे काम पूर्ण होवूनही अद्याप ग्रामस्थांना पाणी पुरवठा झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर गावांना पाणी पुरवठा होण्याकरिता कोणती कार्यवाही केली व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदरहू ९ गावे ही पालघर व २६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट आहेत. सदर योजना जुलै, २००९ मध्ये कार्यान्वित झाली. त्यानंतर पालघर नगरपरिषद व जिल्हा परिषद यांचेमार्फत संयुक्तरित्या योजना चालविण्यात येत आहे.

योजना कार्यान्वित केली त्यावेळी नंडोरे देवखोपसह अंबाडी, शेलवली, वरखुंटी, कमारे पडघे, नंडोरे, बिरवाडी इत्यादी गावांसाठी टाक्या भरुन, जलवाहिनेचे काम पूर्ण करुन, चाचणी घेऊन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला. या योजनेमधील उल्लेख केलेली ९ व इतर ११ गावे असे एकूण २० गावांना जिल्हा परिषदेमार्फत पाणी पुरवठा सुरु करण्यात आला. तसेच मूळ योजनेतील पालघर व ७ गावांना (सद्याची पालघर नगरपालिका क्षेत्र) पालघर नगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा सुरळीत चालू आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हयातील अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा आहार पुरवठा होत असल्याबाबत

**(४) * ६३८६६ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील अनुदानित शाळेत वर्ग १ ली ते ८ वी मध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा आहार पुरवठा होत असून

निविदाधारकाकडून आणि अधिका-यांकडून सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरीता करण्यात आलेल्या करारनाम्याचे उल्लंघन होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.शालेय शिक्षण मंत्री यांचे निदर्शनास आणून दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपुर विभागासाठी अनुक्रमांक १ ते १५ हया धान्यादी मालाचा पुरवठा करण्याबाबत करारनाम्यात उल्लेख करण्यात आलेला असतांनाही त्यापैकी अनुक्रमांक २, ३, ६, आणि ७ वरील वस्तुंचा त्या दरम्यान पुरवठाच झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने उक्त करारनाम्यातील एकूण ४० अटी आणि शर्तीपैकी अ. ३० अटी आणि शर्तीचे उल्लंघन होत असल्याबाबतची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले. त्यानुसार दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.पालघर) तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानातील धान्याचा होत असलेला काळाबाजार

**(५) * ५४६९८ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.पालघर) तालुक्यातील हजारो शिधापत्रिकाधारकांना १७९ शासकीय स्वस्त धान्य दुकानदारामार्फत धान्यसाठा वितरित केला जातो मात्र येथील आदिवासींना उदरनिर्वाहाचे साधन नसल्याने सुमारे साडेबारा हजार कुटुंब

विटभट्टयांवर स्थलांतरीत होऊन सुमारे ८ महिने झाले असून त्यांचा दर महिन्याचा कोटा दुकानदारांना प्राप्त होऊनही सदर साठा दलालांना विकत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने रेशनवरील धान्याचा काळाबाजार करणाऱ्या रास्तभाव दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### औरंगाबाद जिल्ह्यात रॉकेलचा होत असलेला काळा बाजार

**(६) * ५७४२४ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्याकरिता माहे एप्रिल, २०१६ करिता मंजूर केलेला १३८० के.एल. रॉकेलचा पुरवठा काळा बाजारात विकला जात असल्याच्या लेखी तक्रारी जिल्ह्याच्या पुरवठा अधिकाऱ्याकडे अंत्योदय, बीपीएल रेशनकार्डधारकांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने जिल्ह्यासाठी पुरवठा केलेल्या रॉकेलचा दर हा १६.२५ रुपये प्रती लिटर असताना जिल्ह्यात निरनिराळ्या तालुक्यातून हे रॉकेल शासनाच्या दरापेक्षा जादा दराने दुकानदार विकत असल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

अशा स्वरुपाच्या कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा येथील सनफ्लग आर्यन स्टील कंपनीतून होणारे प्रदूषण**

**(७) * ६३५४३ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील सनफ्लग आर्यन स्टील ह्या कंपनीच्या प्रदूषणामुळे वरठी, बीड, नेरी, पाचगाव, पंढराबोडी, दाभा, जमनी व इंदुरखा आदि गावांमध्ये नागरिकांच्या स्वास्थाच्या प्रश्न निर्माण झाला असल्याने शासनाकडे तक्रारी करण्यात येऊन जनआंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यातून उत्सर्जित होणाऱ्या राखेमुळे व सोडण्यात येणाऱ्या खराब पाण्यामुळे परिसरातील शेतीची उत्पादन क्षमता नष्ट झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पबाधित गावामधील नागरिकांची नियमित स्वास्थ परीक्षण तसेच निदान करण्यात येते काय व असल्यास, प्रदूषणामुळे नागरिकांमध्ये कोणकोणत्या व्याधी आढळून आल्या आहेत,

(४) असल्यास, सनफ्लग आर्यन स्टील कंपनीचे हिटिंग व बॉयलर प्लांटला अद्ययावत करण्यासाठी शासनाकडून दिशा निर्देश देण्यात आले आहेत काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर प्रदूषण कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, भंडारा यांच्या दि.१६.०७.२०१६ रोजीच्या अहवालानुसार वरठी, बीड, नेरी, पाचगाव, पंढराबोडी, दाभा, जमनी, इंदुरखा आदि गांवाशी संलग्न केंद्र/उपकेंद्रात आरोग्य सेवक व आरोग्य सेविका कार्यरत आहेत. गांव निहाय पंधरवाडी नियेजित घरभेटी कार्यक्रमानुसार घरभेटी

देवून गांवामधील नागरीकांची नियमित स्वास्थ्य परिक्षण केले जाते. त्यानुसार माहे जानेवारी २०१६ ते जून २०१६ पर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्र, वरठी येथील अस्थमाचे ४४ रुग्ण, ब्रान्काईटीसचे ९४ व ए.आर.आय.चे १५४७ रुग्ण संख्या असल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे माहे जानेवारी १६ ते जून १६ पर्यतच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, मोहदुराच्या अहवालाप्रमाणे अस्थमा-३ व ए.आर.आय.(Acute respiratory infection) चे १५२ रुग्ण संख्या असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु नमुद आजार कंपनीच्या प्रदुषणामुळे झाले असल्याचे निश्चित सांगता येणार नाही.

(४) व (५) सदर कारखान्याला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदुषण नियंत्रणाकरिता अटी व शर्तीच्या अधिन राहुन दिनांक ३०/०१/२०१५ रोजी समंतीपत्र प्रदान केले आहे. दिनांक ३१/०७/२०१५ रोजी प्रदुषण नियंत्रण यंत्रणा अदयावत करण्याकरीता निर्देश दिले आहे. त्याचप्रमाणे रु. २५ लक्ष बँक हमी घेण्यात आली आहे. तसेच माहे ऑगस्ट २०१५ रोजी रु. २ लक्ष बँक हमी जप्त केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हयातील अकोले ३२ गाव पाणीपुरवठा**
**योजनेचे काम निधी अभावी बंद असल्याबाबत**

**(८) * ६२३७३ श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील अकोले ३२ गाव पाणीपुरवठ्याच्या कामास सन २०१२ मध्ये वा त्यादरम्यान सुरुवात करुनही निधी अभावी सदर योजनेचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर योजनेसाठी निधी उपलब्ध करून योजनेचे काम तातडीने करुन नागरिकांना स्वच्छ शुध्द व पुरेसे पाणी पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर योजनेचा उदभव निळवंडे धरणाच्या बुडीत क्षेत्रात असून योजनेअंतर्गत कामे ही दुर्गम भागात व अतिपर्जन्यमान असल्याने पावसाळ्यात कामे करण्यास अडचणी निर्माण होतात. तसेच ५२ कि.मी पाईपलाईनची कामे शेतकऱ्यांच्या शेतामधून जात असल्याने अडचणी निर्माण होतात. याव्यतिरीक्त ठेकेदाराकडून कामाची मंद गती यामुळे योजनेची कामे पुर्ण करण्यास विलंब होत असून ठेकेदाराविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर योजनेवर माहे जून, २०१६ अखेर रु.२०९०.४८ लक्ष इतका खर्च झाला असून सन २०१६-१७ चे कृती आराखड्यात योजनेवर रु.१०५८.९९ लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच योजना माहे डिसेंबर, २०१६ अखेर कार्यान्वित करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी (जि.परभणी) शहरातील वांगी रोड परिसरातील गोदामातून जप्त केलेला गुटखा

**(९) * ६२३०५ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) शहरातील वांगी रोड परिसरातील शेतात असलेल्या गोदामातून अन्न व औषध प्रशासन विभागाने दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास केलेल्या कारवाईत ९ लाख ६० हजार रुपयांचा गुटखा जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन गुटख्याच्या साठा करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी तपास चौकशी सुरू असुन गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयात स्कूल ऑफ प्लॅनिंग अँण्ड आर्किटेक्चर सुरु करण्याबाबत**

**(१०) * ६३७६६ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात स्कूल ऑफ प्लॅनिंग अँण्ड आर्किटेक्चर (स्पा) सुरु करण्याची घोषणा दीड वर्षापूर्वी मा.मुख्यमंत्र्यांनी करुनही अद्याप शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत अद्याप आवश्यक कार्यवाही करण्यात येत नसल्याने विद्यार्थ्याची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) राज्यात स्कूल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर सुरु करण्याबाबत राज्य शासनातर्फे मा. मंत्री (मानव संसाधन विकास), भारत सरकार यांना मा. मुख्यमंत्री यांच्या स्तरावर दिनांक ३०/४/२०१५ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती.

देशातील पायाभूत सुविधांचा नियोजित विकास करण्यासाठी स्कूल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर, नवी दिल्ली या देशातील नामांकित संस्थेस नागरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या समवेत संयुक्तपणे मुल्यांकन करुन राष्ट्रीय/राज्यीय स्तरावर स्कूल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर स्थापनेबाबत अहवाल सादर करण्याबाबत निदेश दिलेले आहेत. सदरचा अहवाल मानव

संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांना प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे केंद्र शासनाने राज्य शासनास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आगामी शैक्षणिक वर्षापासून शालेय विद्यार्थ्यांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत पोषण आहाराचा पुरवठा केला जाणार असल्याबाबत

**(११) * ५५२७३ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून शालेय विद्यार्थ्यांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत पोषण आहाराचा पुरवठा केला जाणार असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केंद्रीय किचन पध्दतीला विरोध करण्यासाठी शालेय पोषण आहार कामगार संघटनेने दिनांक १६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास प्रांत कार्यालय गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) येथे मोर्चा काढून आपल्या मागण्यांचे निवेदन प्रांत, गडहिंग्लज यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त निर्णय घेतल्यास गत दहा-बारा वर्षापासून शालेय विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा पुरवठा करणारे महिला बचत गट व अन्य संस्थांमधील सुमारे दीड लाख कामगार बेकार होण्याचा संभव निर्माण झाल्याने शालेय पोषण आहार योजनेतील केंद्रीय स्वयंपाकगृहाला महिला बचत गट व अन्य संस्थांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बचत गटातील व संस्थामधील बेकार होणाऱ्या महिलांचा/कर्मचा-यांचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागात केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना आहाराचा पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने दि.१८/०६/२००९ रोजी घेतलेला आहे. यानुसार मुंबई महापालिकेव्यतिरिक्त इतर नागरी भागांमध्ये केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे आहाराचा पुरवठा करण्यासाठी संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. तथापि, याबाबत न्यायालयीन बाबी उद्भवल्यामुळे केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली अद्याप सुरू करता आलेली नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २०१५ मध्ये राज्य शासनाच्या बाजुने निर्णय दिलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) राज्य शासनाने केवळ नागरी भागातील शाळांसाठी तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी संस्थांची निवड केलेली आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये आहार शिजवून देण्याचे काम स्थानिक महिला, महिला बचत गट, महिला मंडळ इ. कडून करुन घेण्यात येत आहे. नागरी भागासाठी आहार पुरविण्यासाठी निवड केलेल्या संस्थांमध्ये हि महिला बचत गटांचा समावेश आहे. तथापि, केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीस होत असलेला विरोध विचारात घेवून, याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील महेश डाईंग या कंपनीतून होत असलेले प्रदूषण

**(१२) * ६३४८९ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) मेन रोड मंगल भवन जवळील असलेल्या महेश डाईंग या कंपनीच्या रासायनिक प्रणालीमधुन लाखो लिटर रसायन मिश्रीत सांडपाणी नाल्यात सोडल्यामुळे जल व हवा प्रदुषण मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण बोर्ड यांच्याकडे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार देऊनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर कंपनी मालकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २३.०५.२०१६ रोजी ई मेल व्दारे तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीची चौकशी करण्यात आली असून पाहणी अहवालाची प्रत दिनांक २५.०५.२०१६ रोजी तक्रारकर्ते मा. आमदार, श्री. महेश चौघुले यांना देण्यात आली आहे.

(३) चौकशीमध्ये आढळून आलेल्या तृटीच्या अनुषंगाने संबंधीत उद्योगास दि. २५.०५.२०१६ रोजी ताकीद सूचना व दि. २४.०६.२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे निलंबित प्राचार्यांनी केलेला गैरव्यवहार

**(१३) * ६२८७४ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे निलंबित प्राचार्य धनाजी शंकर गुरव यांनी केलेल्या शासनाच्या ऐंशी लाखांच्या गैरव्यवहाराबाबत त्यांच्यावर त्वरित गुन्हा दाखल करण्याचे आदेश अद्याप देण्यात आले नसल्याने, भारिप बहुजन महासंघाचे अध्यक्ष यांनी दिनांक २४ जून, २०१६ पासून विभागीय सहसंचालक, पनवेल यांच्या कार्यालयासमोर बेमुदत लाक्षणिक उपोषण सुरु करीत असल्याबाबत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महाविद्यालयातील गैरव्यवहार प्रकरणी संबंधित प्राचार्याचे वेतन रोखून तसेच भविष्य निर्वाह निधी खात्यामधील अनियमितता संदर्भातील अहवाल दिनांक ३ डिसेंबर, २०१५ रोजी कोकण विभागीय संचालक (उच्च शिक्षण) यांनी उच्च शिक्षण संचालक व सचिव, उच्च शिक्षण यांना सादर केला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त अहवालानुसार शासनाने दोषी प्राचार्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महाविद्यालयातील गैरव्यवहारा प्रकरणातील संबंधित प्राचार्याचे वेतन रोखून तसेच भविष्य निर्वाह निधी खात्यामधील अनियमितता संदर्भातील अहवाल सह संचालक (उच्च शिक्षण), कोकण विभाग, पनवेल यांनी शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिनांक ३१.०३.२०१६ रोजी सादर केला असून त्याची प्रत शासनास अग्रेषित केली आहे.

(३) सदर महाविद्यालयाचे सन, २००२-२००३ ते २०१२-२०१३ या कालावधीचे केलेल्या अनुदान निर्धारणामध्ये अनियमितता आढळून आली असून वेतन अनुदानाचे रुपये ७३,२३,०७४/- व वेतनेत्तर अनुदानाचे रुपये ५,१६,८०५/- अशा एकूण रुपये ७८,३९,८७९/- एवढ्या रक्कमेचा भरणा करण्याबाबत महाविद्यालयास सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साखरी (ता. राजुरा, जि.चंद्रपूर) गावात निर्माण झालेली पाणी टंचाई

**(१४) * ६३६८० ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरी (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) गावाला भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेकोलीने साखरी येथील शेतजमिनी अधिग्रहित केल्यामुळे भीषण पाणीटंचाईच्या काळातसुध्दा शेतातील बोअरवेलचे पाणी वापरण्यास वेकालीने बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर गावाला लागून वेकोली असल्यामुळे या परिसरातील जमिनीतील पाण्याची पातळी अत्यंत खोल गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर गावाला भीषण पाणी टंचाईची समस्या सोडविण्याबाबत तसेच वेकोलीकडून सीएसआर अंतर्गत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) मौजे साखरी, ता. राजुरा या गावातील पाण्याची पातळी वेकोलीमुळे खोल गेली किंवा कसे याबाबत सर्वेक्षण करण्यासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेस सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कायक्रमांतर्गत योजना कार्यान्वित करुन पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यात आली आहे.

तसेच वेकोलीकडून सीएसआर अंतर्गत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत वेकोली मुख्यालयास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्ह्यात कायमस्वरूपी पाणी टंचाई निवारण्याकरिता करावयाच्या उपाययोजना

**(१५) * ५४४५२ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्याच्या पाणी टंचाई निवारण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांनी घोषणा केली असून उजनी प्रकल्पाबाबत सातत्याने पत्रव्यवहाराद्वारे पाठपुरावा करून सुद्धा मा. मुख्यमंत्र्यांनी सुचवलेल्या माजलगाव प्रकल्पाच्या सर्वेक्षणाचे काम सुरु झाले नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वीच्याच भांडारवाडी प्रकल्पाला मंजुरी देत रुपये ३७ कोटीचा निधी जाहीर करून देखील याची अंमलबजावणी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्ह्यात कायमस्वरुपी पाण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत सदर प्रलंबित प्रकल्पाची आणि घोषित कामांची अंमलबजावणी करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) केंद्र शासनाच्या अमृत योजनेंतर्गत स्लिपद्वारे (SLIP) टप्पा-१ मध्ये लातूर शहराची वितरण व्यवस्था सुधारणा योजना व टप्पा २ मध्ये उजनी धरणातून पाणी पुरवठा योजना अंतर्भूत करण्यात आली आहे.

त्यापैकी टप्पा १ च्या वितरण व्यवस्था सुधारणेच्या योजनेस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे लातूर शहरासाठी उजनी धरण व माजलगाव धरण येथून पाणी पुरवठा योजनेचा प्राथमिक अभ्यास करण्यात आला आहे.

माजलगाव धरण हे जायकवाडी धरणावर अवलंबून आहे व या धरणातसुध्दा या वर्षी अत्यल्प पाणी साठा होता. त्यामुळे सर्वेक्षणाची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

लातूर शहरासाठी उजनी धरणावरुन पाणी पुरवठा योजनेबाबत महानगरपालिकेने ठराव व सर्वेक्षण शुल्काचा भरणा करणे या आवश्यक बाबींची पूर्तता केल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सर्वेक्षण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल.

(२) सदर योजनेस मंजूरी दिल्यानंतर एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने तसेच भंडारवाडी प्रकल्पामध्ये पाणी कमी असल्याने दिनांक १४.७.२०१५ रोजी योजनेची मंजूरी शासनाने रद्द केली आहे.

तसेच रेनापूर (भंडारवाडी) मध्यम प्रकल्पामध्ये जून २०१६ अखेर शिल्लक राहणा-या पाणी साठ्याचा विचार करता प्रस्तावित योजना राबविण्यासाठी लागणारा कालावधी व शिल्लक राहणारे पाणी या बाबी लक्षात घेता सदर योजनेचा या टंचाई कालावधीत उपयोग होणार नसल्याने या योजनेबाबत पुनर्विचार करण्यात आला नाही.

(३) लातूर शहर पाणी पुरवठ्याचा मुख्य उद्भव मांजरा पाटबंधारे प्रकल्प असून तो मोठ्या प्रकल्पामध्ये आहे व या उद्भवावरील अस्तित्वातील योजनेची क्षमता सन २०३३ च्या लोकसंख्येशी पुरेशी आहे, परंतु मागील ३-४ वर्षात अपु-या पर्जन्यमानामुळे या धरणात कमी प्रमाणात साठा उपलब्ध होऊ शकला नाही.

सदर टंचाई निवारणार्थ शासनाने मंजूर केलेल्या १) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेने सुचविलेली योजना २) बेलकुंड येथून ४ द.ल.लि.ची योजना ३) रेल्वेद्वारे पाणी पुरवठ्याची योजना ४) टँकरद्वारे पाणी पुरवठ्याची योजना महानगरपालिका लातूर यांचेकडून राबविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात बालाजी कंपनीचे खाद्यपदार्थ तपासणीसाठी गुडगांव केंद्रीय प्रयोगशाळेत पाठविण्याबाबत

**(१६) * ५८०४८ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात बालाजी कंपनीचे पॅकिंगयुक्त खाद्यपदार्थ तपासणीसाठी गुडगांव केंद्रीय प्रयोगशाळेत पाठविण्यात यावी अशी मागणी शहरातील अनेक

समाजसेवी संघटनेने केली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नागपूर येथील पारडी परिसरात अन्न व औषधी प्रशासनाने पारले कंपनीचे कालबाह्य झालेले बिस्किटचे रिपॅकिंग करणा-या रॅकेटला ताब्यात घेतले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, प्रश्न भाग (१) मधील मागणीप्रमाणे बालाजी कंपनीचे पॅकिंगयुक्त पदार्थांचे नमुने गुडगांव केंद्रीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत काय, त्यानुषंगाने उक्त पदार्थांचे नमुन्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाच्या नागपूर कार्यालयास, जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद नागपूर, यांनी दि. १० जून, २०१६ रोजीच्या पत्रासोबत मोहम्मद शाहीफ शरीफ, अध्यक्ष, भेसळ विरोधी ग्राहक संघटना यांचे दि. ०६/०६/२०१६ चे निवेदन पाठविले होते. त्या निवेदनात बालाजी नामक पदार्थांचे नमुने केंद्रीय प्रयोगशाळेत चाचणी करून घेण्याची मागणी केलेली होती.

(२) होय.

(३) होय, दि. ०४/०८/२०१५ रोजी पारले कंपनीचे कालबाह्य असलेले बिस्किट, वेफर्स, केक या अन्न पदार्थांच्या वेष्टनावरील मूळ उत्पादन तिथी मिटवून नविन उत्पादन तिथी टाकून विक्री करीत असल्याने साठा जप्त करून नष्ट करण्यात आला. सदर प्रकरणी पूर्ण चौकशी करून प्रशासनाने कलम ३१(१) नुसार विनापरवाना व्यवसाय केल्याने मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांचे न्यायालयात खटला क्र. २२९३०/२०१५ दि. ०४/१२/२०१५ रोजी दाखल केला आहे. तसेच याप्रकरणी पोलिसांनीही भा. दं.वि. कलम ४२०,४७२ व ४६८ सहवाचन कलम ५२(१) अन्न सुरक्षा व मानदे कायदा, २००६ नुसार आरोपी तसेच सी ॲण्ड एफ एजंट विरूध्द दोषारोप पत्र क्र. १२६/२०१६ दि. १२/०५/२०१६ रोजी दाखल केले आहे.

मोहम्मद शाहीफ शरीफ, अध्यक्ष, भेसळ विरोधी ग्राहक संघटना यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाने बालाजी नावाने पॅकिंग असलेले १) खट्टा मिठ्ठा मिक्स २) तिखा मिठा मिक्स असे दोन नमुने विश्लेषनार्थ घेऊन सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, नागपूर येथे पाठविण्यात आले आहेत. अन्न सुरक्षा आणि मानके नियम, २०११ च्या नियम २.४.१ नुसार अन्न नमुने प्रथमतः स्थानिक प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळेत पाठविणे गरजेचे आहे. स्थानिक प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळेचा विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतरच केंद्रीय प्रयोगशाळेत अन्न नमुना पाठवू शकतो. बालाजी पॅकिंगयुक्त पदार्थाचे विश्लेषणासाठी घेतलेल्या नमुन्यांचे स्थानिक प्रयोगशाळेचा विश्लेषण अहवाल प्रलंबित असल्याने ते नमुने केंद्रीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर-पाचपावली (जि.नागपूर) येथील हबीबनगर टेका नाका येथील बनावट पिस्ता तयार करणाऱ्या कारखान्यावर टाकण्यात आलेला छापा

**(१७) * ५४३९६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील हबीबनगर, टेका नाका येथे घातक रसायनांचा वापर करून शेंगदाण्यापासून बनावट पिस्ता तयार करणा-या कारखान्यावर पाचपावली पोलिसांनी छापा घालुन रूपये ३ लाख १० हजार ७३३ रुपयांचा माल जप्त केला असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट पिस्ता शहरातील सोनपापडी निर्माते आणि मिठाई तयार करणा-यांना विकण्यात येते आणि कमी किंमतीत पिस्ता मिळत असल्याने त्यांना सहजच ग्राहकही उपलब्ध होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नागपूर शहरात मोठ्या प्रमाणात बनावट पिस्ता व सोनपापडी विक्रेते असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात व उक्त ठिकाणी अशाप्रकारे बनावट ड्राय फ्रुट विक्रेत्यांची चौकशी करून शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

दि. ३ जुलै, २०१६ रोजी अशी घटना पोलीसांच्या निर्दशनास आली होती. पोलीसांनी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांना त्याविषयी अवगत केले असता. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांना हबीब नगर, टेका नाका नागपूर येथे अन्वर खान हे शेंगदाण्याला कृत्रिम रंग लावुन व त्याच्या चकत्या तयार करून पिस्ता म्हणून विक्री साठी उत्पादन करीत असल्याचे निदर्शनास आले.

(२) पोलीसांनी घेतलेल्या जबाबावरून काही मिठाई विक्रेत्यांना सदर बनावट पिस्ता विकत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) राज्यात अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत अन्न व औषध प्रशासनाकडून अन्न आस्थापनांच्या तपासण्या करण्यात येतात. अशा कारवाई अंतर्गत राज्यात अशी इतर प्रकरणे आढळुन आलेली नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**राज्यात बेटनोवेट सी क्रीम व एन क्रीम यांचा गैरवापर होत असल्याबाबत**

**(१८) * ५५३८४ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात त्वचा रोगावरील उपचारांसाठी डॉक्टरांकडून सुचविण्यात येणारी व किंमतीने अत्यल्प असलेली बेटनोवेट सी क्रीम व एन क्रीम यांचा गैरवापर होत असल्याची गोपनीय माहिती अन्न व औषध प्रशासनाच्या दक्षता विभागास मिळाल्याने त्यांनी मुंबईतील देसाई फार्मा या कंपनीने मोठया प्रमाणात सदरहू औषधांचा साठा अवैधरित्या विकल्याने सदरहू साठा जप्त करुन संबंधितांविरोधात एल.टी.मार्ग पोलीस ठाण्यात फसवणूकीसह औषधे व सौंदर्य प्रसाधने

कायद्यान्वये गुन्हा दाखल केल्याची माहिती दिनांक ३१ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले, त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) बेटनोवेट सी क्रीम ची अवैधरीत्या खरेदी विक्री होत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाकडे प्राप्त झाली व त्यानुषंगाने दि. ०९/०२/२०१६ रोजी मुंबईतील देसाई फार्मा या घाऊक औषधी विक्रेत्याने सदर औषधांची अवैधरीत्या विक्री केल्याचे आढळुन आले. त्यामुळे सदर विक्रेत्याकडे असलेल्या साठ्यातुन २ नमुने चाचणीसाठी घेऊन उर्वरित रू. १८,९००/- चा साठा जप्त करण्यात आला.

(२) सदर प्रकरणी चौकशी करून मे. देसाई फार्मा, मुंबई, मे. आदर्श सेल्स, मुंबई, मे. झी मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, मुंबई व मे. संघवी एन्टरप्रायजेस, मुंबई अशा चार पेढ्यांवर कारवाई करून त्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. त्यांपैकी देसाई फार्मा, मुंबई यांचेवरील परवाने रद्दच्या कारवाईस शासनाने स्थगिती दिली आहे. चारही पेढयांच्या विरोधात संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरा (ता.पातुर,जि.अकोला) जिल्हा परिषद शाळेकरिता देण्यात आलेल्या निधीचा झालेला अपहार

**(१९) * ६२२८८ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरा (ता.पातुर, जि.अकोला) जिल्हा परिषद शाळेला सन २००९-१० मध्ये सर्वशिक्षा अभियांनातुन एकूण सहा वर्ग खोल्याचे बांधकाम करण्याकरिता निधी देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरा जिल्हा परिषदेमधील उच्चश्रेणी मुख्याध्यापक यांनी शाळा व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष यांच्या खोट्या सह्या घेऊन सदर निधीमधील ३ लाख रुपयांची अफरातफर केल्या प्रकरणी चौकशी करण्याची मागणी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनी केल्याचे दिनांक २९ मे, २०१६ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सर्व शिक्षा अभियानाच्या निधीतून लाखोंचा अपहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

उमरा, (ता.पातूर, जि.अकोला) या जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी सन २०१०-११ मध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सहा वर्गखोल्या बांधण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांच्या खोटया सहया घेऊन सदर निधीचा अपहार केल्याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनी दिनांक २५/०४/२०१६ रोजी केली आहे.

(३) याबाबत चौकशी करण्यात आलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माजी सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, मुंबई यांनी पदाचा केलेला दुरुपयोग

**(२०) * ६२९७५ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. मंजुषा मोळवणे, माजी सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, मुंबई यांनी पदावर असताना आपल्या पदाचा दुरुपयोग केल्याची तक्रार नॅशनल फोरम फॉर क्वॉलिटी एज्युकेशन, नागपुर यांनी दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक उच्च शिक्षण विभाग यांनी मुख्यालय सहसंचालक पुणे यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करुन डॉ. मंजुषा मोळवणे यांची दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी सुनावणी घेतली असुनही त्यांचेवर कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार डॉ. मंजुषा मोळवणे यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) चौकशी समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(४) नॅशनल फोरम फॉर क्वालिटी एज्यूकेशन यांनी चौकशी दरम्यान उपस्थित केलेल्या काही मुद्यांबाबत सहसंचालक, मुंबई यांचा अहवाल तसेच यासंदर्भात डॉ. मंजुषा मोळवणे यांच्याकडून त्यांचे म्हणणे अद्याप प्राप्त झालेले नसल्याने चौकशी समितीने त्यांचा अहवाल सादर केलेला नाही.

-----------------

## बसमत शहरात व सेनगांव (जि.हिंगोली) तालुक्यात निळ्या रॉकेलचा होत असलेला काळाबाजार

**(२१) * ५६२२५ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बसमत शहरात व सेनगांव (जि.हिंगोली) तालुक्यात निळ्या रॉकेलचा काळाबाजार सुरु असून माहे एप्रिल-मे महिन्यांचे रॉकेल रास्तभाव दुकानदारांना मिळाले नसून सदर रॉकेलची परस्पर टँकरव्दारे तालुक्याबाहेर विक्री होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त जिल्हयातील गोरगरीब लाभार्थ्यांना वाटप केला जाणारा स्वस्त धान्य दुकानातील गहू लोहगाव शिवारात उतरवित असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

सेनगाव शहरातील केरोसिन वितरणाबाबत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता किरकोळ केरोसिन परवानाधारक व रास्तभाव दुकानदारांना केरोसिन मिळाले असून शिधापत्रिकाधारकांनाही केरोसिन मिळाले असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) दि.१४ जून, २०१६ रोजी मौजे लोहगाव शिवारात नायब तहसीलदार, हिंगोली व स्थानिक गुन्हे शाखा, हिंगोली यांचेमार्फत ७३ पोते गहू जप्त करण्यात आला.

आरोपीने सदर गहू कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली येथून खरेदी केल्याबाबतच्या पावत्या सादर केल्या आहेत.
(३) सदर गहू स्वस्त धान्य दुकानातील लाभार्थ्यांच्या वाटपाकरिता आहे किंवा कसे याचा तपास सुरु आहे.

मौजे लोहगाव परिसरातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या तपासण्या केल्या असता उचल केलेले धान्य शिधापत्रिकाधारकास वाटप करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. धान्य गोदामाची तपासणी केली असता धान्य साठा बरोबर असल्याचे आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) पूर्वेतील चिंचपाडा परिसरातील साकेत महाविद्‌यालयात दहावी, बारावी परिक्षेसाठी डमी विद्‌यार्थी बसविण्यात आल्याबाबत

**(२२) * ५४०३८ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि. ठाणे) पूर्वेतील चिंचपाडा परिसरातील साकेत महाविद्‌यालयात राष्ट्रीय मुक्त विद्‌यालय शिक्षा संस्था दिल्लीच्या वतीने घेण्यात येत असलेल्या

दहावी, बारावी परिक्षेसाठी डमी विद्यार्थी बसवून परिक्षा देणारे रॅकेट पकडण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी महाविद्यालयाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, याबाबत ई-मेलद्वारे राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षा संस्थान,पुणे यांच्याकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्याअनुषंगाने पोलिस स्टेशन कोळसेवाडी, कल्याण (पूर्व) येथे सदर महाविद्यालयाविरोधात राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षा संस्थान,पुणे यांनी एफ. आय. आर दाखल केलेला आहे.

(२) व (३) राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षा संस्थान, ही संस्था राज्य शासनाच्या अखत्यारीत येत नाही.

-----------------

### भूगाव व इंझापूर (जि.वर्धा) येथील कंपन्यांकडून होत असलेल्या प्रदुषणाबाबत

**(२३) * ६३२४३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूगाव व इंझापूर (जि.वर्धा) येथे उत्तम गाल्वा मेटॅलिक लि., उत्तम व्हल्यू स्टिल लि. व इंद्रजित पॉवर प्लॉन्ट या कंपनीकडून होत असलेल्या प्रदुषणाबाबत नागरिकांनी, सरपंचानी व अनेक पदाधिकाऱ्यांनी प्रदुषण विभाग, मा. पालकमंत्री, जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याकडे वांरवार दिलेला निवेदनावर तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीनी वर्धा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सदर प्रकरणी कंपनीवर चौकशी करण्याची मागणी करण्यात येवून सुध्दा अद्यापही सदर कंपनीवर प्रदुषणाबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनी कडून होत असलेल्या प्रदुषणाची चौकशी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशी समितीने नागरिक, शेतकरी, तक्रारदार यांच्यासोबत चर्चा करून मोका तपासणी करून चौकशी केलेला अहवाल जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंपनीकडून मोठया प्रमाणात प्रदुषण होत असल्याने फक्त उपाययोजना सुचविण्यात आली असल्याची नोंद चौकशी अहवालात नमूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने उक्त कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) यासंदर्भात एका राजकीय पक्षाचे निवेदन महाराष्ट्र प्रदूषण मंडळास दि.१५/१२/२०१५ रोजी प्राप्त झाले. त्या अनुषंगाने निवासी जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली दि.५/०१/२०१६ रोजी सदरील उद्योगामुळे होत असलेल्या प्रदूषणाच्या तक्रारीबाबत समिती गठीत केली असून सदर उद्योगास अंतरिम निर्देश बजावण्यात आलेले आहेत
(३) व (४) गठीत समितीच्या सदस्यांनी दि.१४/०१/२०१६ रोजी मौका तपासणी केली व त्याबाबतचा सविस्तर अहवालाच्या आधारे जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८/०६/२०१६ रोजी सदर उद्योगाच्या प्रदूषणाबाबत समितीचे सदस्य व उद्योगाच्या प्रतिनिधी समवेत बैठक झाली. बैठकी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यास व उद्योगाच्या प्रतिनिधीना उचित कार्यवाही करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.
(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडुन सदर उद्योगास दि.११/०५/२०१६ रोजी अंतरिम निर्देश बजावण्यात आलेले असून रू.५.०/- लक्ष ची बँक हमी सुध्दा घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

-----------------

**राज्यात दुधातील भेसळ ओळखणारे क्षीर-स्कॅनर हे मापक तातडीने सर्वत्र बसविण्याबाबत**

**(२४) * ५८८६४ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान खात्याच्या कौन्सिल ऑफ सायन्टीफिक ॲण्ड इंडस्ट्रीयल रिसर्च या संस्थेने दुधातील युरिया, मीठ, डीटर्जंट, सोडा यांची भेसळ ओळखण्यासाठी क्षीर-स्कॅनर हे अत्यंत स्वस्तातले व झटपट निदान करणारे मापक तयार केले असून राज्यांनी ठिकठिकाणी हे स्कॅनर उपयोगात आणावेत अशी सूचना मा. केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान मंत्री महोदयांनी दिनांक २४ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मा. केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान मंत्री महोदयांच्या सूचनेनुसार राज्यात ठिकठिकाणी क्षीर-स्कॅनर हे मापक बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) मा. केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान मंत्री महोदयांनी प्रसार माध्यमांना दिलेल्या दि. २०/०२/२०१६रोजी प्रसिध्द केलेल्या प्रेस नोट व्दारे केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या कौन्सिल ऑफ सायन्टीफिक ॲण्ड इंडस्ट्रीयल रिसर्च या संस्थेने दुधातील भेसळ ओळखण्यासाठी क्षीर स्कॅनर हे मापक विकसित केल्याचे इंटरनेटव्दारे निदर्शनास आले आहे.

(२) अन्न व औषध प्रशासनाकडून याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनास पाठविण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतींमधील प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत

**(२५) * ५५७७०  श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतींमधील प्रदूषणामुळे १५ कि.मी. परिसरातील नागरिकांना श्वसनाचे रोग, सततची सर्दी, डोकेदुखी, त्वचेचे आजार, दमा, स्त्रियांना वंध्यत्व इ.चा त्रास होत असून रामकी कंपनीच्या “मुंबई वेस्ट मॅनेजमेंट” प्रकल्प व सिडको डंपिंग ग्राउंडमुळे प्रदूषणात वाढ झाल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या प्रदूषणाच्या मुद्दयावरून सिडकोचे डंपिंग ग्राउंड व रामकीच्या मुंबई वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्पाविरोधात स्थानिक ग्रामस्थांनी आंदोलने करून तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रामकी कंपनीच्या प्रकल्पाला तीव्र विरोध असतानासुद्धा ३० एकरावर नव्या प्रकल्पाचे काम उक्त कंपनीने सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त कंपनी बंद करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) अंशत: खरे आहे.

मे.मुंबई वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्प व सिडको डपिंग प्रकल्पामुळे प्रदुषणात वाढ झाल्याची तक्रार सदगुरू वामन बाबा महाराज प्रदूषण विरोधी संघर्ष समिती यांच्या कडून मे २०१६ मध्ये प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सद्य:स्थितीमध्ये प्रकल्पाचे काम रामकी कंपनीने थांबविले आहे.

(४) मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. व सिडको नागरी घनकचरा प्रकल्पाच्या प्रदूषणाबाबतचा आढावा घेण्यासाठी तहसिलदार पनवेल यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३१.०५.२०१६ च्या कार्यालयीन आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची पहिली बैठक दि.१३.०६.२०१६ रोजी झाली असून या दिवशी सिडकोच्या घनकचरा प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. दूसरी बैठक दि.०८.०७.२०१६ रोजी झाली. या वेळी मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. यांची स्थळ पाहणी करण्यात आली असुन समितीचा अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रादेशिक अधिकारी रायगड यांनी अधिक्षक अभियंता (के.के.) सिडको लि. यांना नागरी घनकचरा प्रकल्पातील त्रुटीच्या सुधारणांबाबत, दिनांक २८/०६/२०१६ अन्वये जल प्रदुषण अधिनियम, १९७४ व हवा प्रदुषण अधिनियम, १९८१अन्वये प्रस्तावित आदेश पारित केले आहेत. सद्य:स्थितीत ३० एकर जागेवर सुरु केलेले काम कंपनीने थांबविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोरे नं. २ (ता.वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग) येथे भारत निर्माण योजनेंतर्गत नळ योजनेच्या कामात झालेला अपहार**

**(२६) * ५७०८२ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोरे नं. २ (ता. वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग) या गावासाठी भारत निर्माण योजनेंतर्गत सन २००७ मध्ये मंजूर झालेल्या नळ योजनेच्या कामात तत्कालीन ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती अध्यक्ष व सचिव यांनी रकमेचा अपहार केल्याबाबत कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग यांनी प्राधिकरणामार्फत करण्यात येत असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने अपहार करणाऱ्या अध्यक्ष व सचिव यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय, असल्यास, कारवाईची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषद जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या निर्देशानुसार उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, उपविभाग कणकवली यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून, त्या अनुषंगाने अपहार करणा-या अध्यक्ष व सचिव यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यात ७८ टक्के पाणी उद्भव दूषित असल्याबाबत व १३ विंधन विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२७) * ५३७३९ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात ७८ टक्के पाणी उद्भव दूषित असल्याचा अहवाल माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आरोग्य विभागाने सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त तालुक्यातील प्रशासनाने तयार केलेल्या संभाव्य आराखड्यामध्ये ३६ गावे व आदिवासी वाड्यांपैकी २ गावे व ११ आदिवासी वाड्याकरिता एकूण १३ विंधन विहिरींना मंजुरी दिली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागात पाणी टंचाईची समस्या अतिशय गंभीर झाली असून १३ विंधन विहिरींना मंजुरी मिळून महिना होऊन सुद्धा विहिरी खोदकामासाठी एजन्सी मिळत नसल्यामुळे विंधन विहिरींचे काम प्रलंबित आहे तसेच पाण्याच्या दूषित उद्भवामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पाणी उद्भवाचे शुध्दीकरण करण्याकरिता व उक्त विंधन विहिरी पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही

(४) दूषित आढळून आलेल्या उदभवांना त्वरीत पाणी शुध्दीकरण करणेकरिता संबधित ग्रामपंचायतीना कळविण्यात आले आहे.

पनवेल गटामध्ये १३ विंधन विहिरी पैकी १२ विंधन विहिरीची खोदाई पूर्ण करुन यशस्वी विंधन विहिरीवरती हातपंप बसवून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**औरंगाबाद विभागीय शिक्षण मंडळात बारावीच्या उत्तरपत्रिका पुनर्लेखनात झालेला गैरव्यवहार**

**(२८) * ५४४६५ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागीय शिक्षण मंडळातील सहा कर्मचा-यांना बारावीच्या उत्तरपत्रिका पुनर्लेखनात झालेल्या गैरप्रकाराप्रकरणी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या सुमारास अटक करण्यात आली आहे, तसेच इयत्ता १२ वी तील उत्तरपत्रिका रॅकेट प्रकरणात जालना पोलिसांनी दिनांक २९ मार्च, २०१६ रोजीच्या सुमारास वाटूरफाटा येथील एका महाविद्यालयाच्या प्राचार्यास दोन लिपिकांसह अटक केली असून या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार याप्रकरणी दोषी असलेल्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) राज्यमंडळ स्तरावरुन सदरील प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे असलेल्या इंग्रजी अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबत**

**(२९) * ५८०६४ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे गत तीन वर्षा पासून जिल्ह्यातील ५४ इंग्रजी शाळा अनधिकृत असल्याची माहिती असतानासुध्दा सदर अनधिकृत शाळांवर कोणतीही कारवाई केली नसल्याची बाब माहे जून, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार तीन वर्षापासून अनधिकृत असलेल्या शाळांवर तसेच याबाबतची माहिती लपवून ठेवणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) नागपूर जिल्ह्यातील ५४ अनधिकृत शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत शाळा बंद करण्यासंदर्भात संबधितांना नोटीस देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) प्रवेश देणे बंधनकारक असूनही काही शाळा प्रवेश नाकारीत असल्याबाबत**

**(३०) * ५४३०७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायदयानुसार (आरटीई) आर्थिक व दुर्बल घटकांसाठी २५टक्के राखीव प्रवेश देण्यास मुंबईतील खाजगी शाळांनी नकार दिल्याप्रकरणी लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनानी मा.शिक्षणमंत्री यांचेकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास तक्रार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थ्यांसाठी खासगी शाळांत २५ टक्के राखीव कोटयातील ३२५५ जागा रिक्तअसून त्याकरिता गोरेगांव येथील लक्ष्मधाम शाळेसाठी सर्वाधिक अर्ज आले असून, १८५ शाळांसाठी क्षमतेपेक्षा जास्त अर्ज आले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील एकूण ७८० शाळामधील एकूण १६८९४ जागांसाठी मागविण्यात आलेल्या अर्जांपैकी पहिल्या फेरीसाठी ११८४८ विदयार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यातील ८२३० विदयार्थी प्रवेशास पात्र ठरले असताना काही विदयार्थ्यांना प्रवेश देताना विनाकारण त्रास दिला जात असल्याचे तसेच उक्त शहरातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी २५% आरक्षित असलेल्या जागांसाठी ऑन लाईन प्रवेश प्रक्रीया अंतर्गत प्रवेश नाकारले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, गत अनेक दिवसापासून "आरटीई" प्रवेशांकडे विदयार्थ्यांचा ओढा वाढत असून या प्रवेशाच्या बदल्यात शासनाकडून कोणताही आर्थिक मोबदला मिळत नसल्याने अनेक शाळा हे प्रवेश नाकारीत असल्याने शाळांनी अल्पसंख्याक दर्जा मिळविण्याचे प्रयत्न सुरु केले असून अल्पसंख्याक विभागाकडे मोठया प्रमाणात अर्ज आले असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच कोल्हापूरसह राज्यातील गरीबांच्या मुलांना श्रीमंताच्या शाळेत प्रवेश मिळावा म्हणून शासनाने २५ टक्के कोटा पध्दत अवलंबली असता सदर शाळेत प्रवेश घेण्यास पालक उत्सूक नसल्याचे तसेच कोल्हापूर जिल्हयातील प्रस्ताव सादर केलेल्या काही शाळांना गत तीन वर्षात प्रवेश शुल्क परतावा न मिळाल्याने विदयार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अडचणीत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने उक्त कायद्यातंर्गत प्रवेश न देणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

(४) एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ या कालावधीत अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ४१ संस्थांनी अर्ज केले असून ३६ संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आला आहे.

(५) अंशत: खरे आहे.

२५% कोटयांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतीपूर्ती केली जात असून इतर खर्चाची प्रतिपूर्ती केली जात नसल्याने आर्थिक दुर्बल व वंचित घटकातील पालकांनी या प्रक्रियेकडे दुर्लक्ष केल्याचे आढळून आले आहे.

(६) सदर कायद्यांतर्गत प्रवेश न दिलेल्या शाळांना ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.